

तरुण भारत
गुरुवार, १० मार्च २०१६

डॉ. व्ही. ए. पाटील हे गेल्या तीन तपाहून अधिक काळ सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून प्राध्यापक व प्राचार्यपदावर कार्यरत असून मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेंद्राच्या सल्लागार समितीवर व अलिकडेच विद्यापीठाने स्थापन केलेल्या उच्च शिक्षणाच्या बृहत आराखडा समितीवर सदस्य म्हणून काम केले. तसेच विद्यापीठाच्या विविध समित्यांवर त्यांनी तज्ज्ञ सदस्य म्हणून कामगिरी केली आहे. या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या उच्च शिक्षणाचा त्यांनी घेतलेला आढावा...



प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील
लक्ष्मीबाई सीताराम हळवे
महाविद्यालय, दोडामार्ग
ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग

उच्च शिक्षणाची दशा आणि दिशा

२४ जानेवारी १८५७ रोजी स्थापन झालेले भारतातील पहिले विद्यापीठ म्हणून कलकत्ता विद्यापीठाला मान जातो. त्यानंतर सहा महिन्यांनी म्हणजे १८ जुलै १८५७ रोजी हे मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. तर त्याचवर्षी ५ सप्टेंबर रोजी मद्रास विद्यापीठ स्थापन झाले. तेव्हापासून मुंबई विद्यापीठ मुंबई इलाख्यातील पहिले पण भारतातील अग्रगण्य विद्यापीठ म्हणून गणले जाऊ लागले व जात आहे. या विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांनी भारतातच नव्हे, तर जगाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रात फार मोठी कामगिरी केली आहे. मुंबई विद्यापीठाच्या कक्षेत गुजरात, महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकाचे चार जिल्हे येत असत. प्रारंभी मॅट्रिकची परीक्षाही विद्यापीठच घेत असे. ब्रिटिशराज स्थापन झाल्यानंतर पाश्चात्य शिक्षणाचा श्रीगणेशा भारतात झाला असला तरी मुंबईत मात्र त्यापूर्वीच पोर्तुगीजांनी पाश्चात्य शिक्षणाचे बीजारोपण केले होते. १५८० मध्ये मुंबईत व मुंबई इलाख्यातही खऱ्याअर्थाने पहिले कॉलेज स्थापन झाले ते जेसुईट कॉलेज बोरिवलीनजीकच्या मंडपेश्वर येथे. शिवजन्माच्या अगोदरच पोर्तुगीजांनी महाराष्ट्रात उच्चशिक्षणाचा प्रारंभ केला होता, हे लक्षात घेतले पाहिजे. अर्थात ही सर्व पोर्तुगीज भाषेतून शिक्षण देणारी महाविद्यालये होती.

पाश्चात्य शिक्षण

माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या पुढाकाराने पौर्वात्य शिक्षण देणारे पुना संस्कृत कॉलेज १८२१ मध्ये पुण्यात स्थापन झाले असले तरी महाराष्ट्रात इंग्रजी उच्च शिक्षणाचा पाया घातला तो १८३५ मध्ये मुंबईत स्थापन झालेल्या एल्फिन्स्टन कॉलेजने. त्यानंतर विद्यापीठाची स्थापन होण्याअगोदरच विल्सन कॉलेज या आणखी एका महाविद्यालयाची भर पडली. ब्रिटिश राजवटीत विद्यापीठाची वा महाविद्यालयांची स्थापना म्हणून फक्त सावंतवाडीच्या पंचम खेमराज महाविद्यालयात विज्ञान शाखा अस्तित्वात होती. शिक्षणही अगदी साचेबद्ध पद्धतीने होते. मुंबई विद्यापीठाचे ग्रामीण महाविद्यालयाकडे म्हणावे तसे लक्ष नव्हते. त्यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात कमालीची उदासीनता आली होती. शिक्षक, कारकून निर्माण करण्यापलीकडे शिक्षणाचा फारसा उपयोग होत नव्हता. २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर असतांनाही म्हणजे २००१ पर्यंत जिल्ह्यात फक्त दहा महाविद्यालये होती. पण आता हे चित्र गुणात्मक नसले तरी संख्यात्मकदृष्ट्या बदलू लागले असून काळाची पावले ओळखून नवनवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विनाअनुदानीत महाविद्यालयांची संख्या आता केवळ तालुक्याच्या ठिकाणीच नव्हे तर ग्रामीण भागातही वाढू लागली आहे. कृषी विद्यालय, कृषी तंत्रनिकेतन, पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन, अन्न तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, फाईन आर्ट, अभियांत्रिकी, होमिओपॅथीक, आयुर्वेदीक, नर्सिंग पदवी इ. विविध नवनवीन पदवी व पदव्युत्तर ज्ञानशाखांची महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ व एस. एन. डी. टी विद्यापीठाचे अभ्यासक्रमही राबविणारी महाविद्यालये जिल्ह्यात सुरू झाली आहेत. एकट्या मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत जिल्ह्यातील महाविद्यालयांचीच संख्या आज ३४ पर्यंत पोहोचली असून एकूण महाविद्यालयांची संख्या ५० च्या आसपास आहे. जागतिकीकरण व खासगीकरणाचा हा परिणाम असून आता खासगी विद्यापीठेही जिल्ह्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बेळगावच्या लोकमान्य संस्थेचे बॅ. नाथ पै आंतरराष्ट्रीय विद्यापीठ' सावंतवाडी रोड रेल्वेस्थानकानजीक प्रस्तावित आहे. एकूणच व्यवसायभिमुख व गरजाभिमुख अभ्यासक्रम देणारी महाविद्यालये सुरू होत असल्याने आता सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही जिल्ह्यात राहून उच्चशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. बदलती जागतिक व्यवस्था, अर्थव्यवस्था व गरजांचा विचार करता अजूनही जिल्ह्यात नवनवीन ज्ञानशाखांची आवश्यकता आहे.

विद्यापीठाचा बृहद् आराखडा

सिंधुदुर्ग जिल्ह्याचा शैक्षणिक बॅकलॉग भरून काढण्यासाठी मुंबई विद्यापीठाने आता खास लक्ष दिले असून विद्यापीठाचा बृहद् आराखडा तयार करून तो शासनाकडे शिफारशीसह पाठविला आहे. विशेषत: विद्यार्थिप्रिमी व कोकणाशी कमालीची बांधिलकी स्वीकारलेले धडाडीचे तरुण कुलगुरु डॉ. संजय देशमुख यांनी आता विद्यापीठलाच कोकणाभिमुख बनविण्याचा विडा उचलला आहे. कुलगुरु पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी पहिली भेट दिली ती दोडामार्गच्या लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाला. ६ ऑगस्ट २०१५ रोजी त्यांनी या महाविद्यालयाला दिलेली भेट अविस्मरणीय आणि कुलगुरुंच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास भारावून टाकणारी ठरली. महाविद्यालयांबरोबरच जिल्ह्यातील अनेक शिक्षणप्रेमींबरोबर चर्चा करण्यासाठी त्यांनी तीन-चार तास वेळ दिला. त्यानंतर जिल्ह्यात अनेक कार्यक्रमानिमित्त डॉ. देशमुख यांचा दौरा नेहमीच असतो. विशेषत: प्रथमच विद्यापीठाचा बृहद् आराखडा बनवितांना या समितीवर सदस्य म्हणून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्राचार्यांना प्रतिनिधीत्व दिल्याने साहजिकच जिल्ह्याचे प्रतिबिंब बृहद् आराखड्यावर पडण्यास मदत झाली. यावरून कुलगुरु डॉ. देशमुख यांचे जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासाकडे किती लक्ष आहे, बांधिलकीची किती भावना आहे, हे स्पष्ट होते.

विद्यापीठाने तयार केलेल्या बृहद् आराखड्यानुसार जिल्ह्यात एक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (मालवण), स्थापत्यशास्त्र (ओरोस), औषध निर्माण शास्त्र, कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, विधी महाविद्यालय, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील रात्र महाविद्यालय, महिला महाविद्यालय अशा प्रत्येकी एकेक महाविद्यालयासाठी शिफारस करण्यात आली आहे. याशिवाय विविध क्षेत्रातील कौशल्याधिष्ठित मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन याबाबतचे प्रमाणपत्र, पदविका व पदवी अभ्यासक्रम, नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी महाविद्यालयांना प्रोत्साहन देण्याबरोबरच एन.सी.टी.ई.च्या मार्गदर्शक तत्वानुसार अस्तित्वात असलेल्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये बी. ए. बी. एड., बी. एस्सी., बी. एड. हा चार वर्षाचा इंटिग्रेटेड प्रोग्राम सुरू करणे, संलग्नित महाविद्यालयांची गुणवत्ता वाढविण्यासाठी व सर्वत्र उच्च दर्जाच्या शैक्षणिक सोई उपलब्ध होण्याच्या दृष्टीने 'नॅक'कडून मूल्यांकन करून घेतलेल्या महाविद्यालयांना स्मार्ट कॉलेज योजनेंतर्गत
प्रोत्साहन देणे, एल.एम.एम. अभ्यासक्रम संलग्नित विधी महाविद्यालयामध्ये सुरू करणे अशा तरतुदीही या बृहद् आराखड्यात करण्यात आल्या आहेत. याशिवाय विद्यापीठाच्या दूर व मुक्त शिक्षण संस्थेची (IDOL) विविध केंद्रे जिल्ह्यातील महाविद्यालयात सुरू करण्यास प्रोत्साहन देण्याबरोबरच सिंधुस्वाध्याय प्रकल्पांतर्गत व विभागामार्फत १. ओशनोग्राफी, २. फायर अँड सेफ्टी मॅनेजमेंट, ३. पॉवर्टी मॅनेजमेंट, ४. एम.बी.ए. (स्पोर्टस् मॅनेजमेंट), ५. फूड प्रोसेसिंग टेक्नोलॉजी, ६ इको टुरिझम ७. बायो डायव्हर्सिटी कन्झर्व्हेशन आणि ८. बांबू अँड केन इंडस्ट्री इ. पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्याबाबतही प्रस्तावित करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या बृहद् आराखड्याचा फायदा जिल्ह्यातील महाविद्यालयांनी करून घेण्याची गरज आहे. कोकणच्या शैक्षणिक विकासासाठी मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र रत्नागिरीत सुरू केले आहे. या उपकेंद्रात सध्या काही प्रमाणात प्रशासकीय कामकाजाबरोबर पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविले जातात. आता सदर उपकेंद्र सक्षम बनविण्याचा प्रयत्न केला जात असून भारतीय रेल्वे व विद्यापीठ यांच्या झालेल्या करारानुसार 'रेल इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी सेंटर" सुरू करण्यात येणार असून पुढील पदव्युत्तर व पदवीपूर्व अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत. त्यात १ एम. टेक /एम. ई. (रेल्वे मेकॅनिकल इंजिनियरिंग), २. टेक/एम. ई. (सिव्हील इंजिनियरिंग) या अभ्यासक्रमांचा समावेश असून त्याचा लाभ सिंधुदुर्गातील विद्यार्थ्यांनाही होणार आहे.

युजीसीने पुरस्कृत केलेल्या मॉडिल कॉलेजची संकल्पना विद्यापीठाने यापूर्वीच स्वीकारली असून तळेरे (ता. कणकवली) येथे एक सुसज्ज इमारतीसह मॉडिल कॉलेज स्थापन करण्यात आले आहे. या महाविद्यालयात बी. एम. एस. आणि बी. एस्सी. आय.टी. हे दोन अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. शिवाय यु.जी.सी. च्या शिफारशीनुसार जिल्ह्यातील काही महाविद्यालयांनी 'नॅक'कडून 'अ" श्रेणी मिळविली आहे. हे सर्व पाहता सिंधुदुर्ग जिल्हा हा आता एका शैक्षणिक क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा असल्याने भविष्यकाळात एक 'एज्युकेशन हब" म्हणून जिल्हा नावारुपास येऊ शकतो. जिल्ह्यात अद्यापही दंत महाविद्यालय, पर्यावरण व्यवस्थापन, हॉटिल व्यवस्थापन, सायंकालीन कायदा अभ्यासक्रम, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शुश्रुषा महाविद्यालयांची गरज आहे. गोवा राज्यातील मोपा येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ, परुळे येथील डोमॅस्टिक विमानतळ, प्रस्तावित मरीन पार्क, मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण, कोकण रेल्वेचे दुपदरीकरण या सर्व सुविधांमुळे जिल्ह्याच्या आर्थिक आणि पर्यटन विकासास फार मोठी गती मिळणार आहे. परंतु दुर्दैवाने पर्यटन विकासाला पूरक असे मनुष्यबळ, तंत्रज्ञान व कौशल्य विकसीत करणारा एकही अभ्यासक्रम आजही जिल्ह्यात नाही. केंद्र व राज्य सरकारने पर्यटन जिल्हा म्हणून सिंधुदुर्गाची निवड केल्यानंतर मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असा १२ वी नंतर 'डिप्लोमा इन टुरिझम मॅनेजमेंट" हा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम मी बांद्याच्या गोगटे वाळके कॉलेजमध्ये प्राचार्यपदी असताना सुरू केला होता.

पान ७ वर ▸▸



उच्च शिक्षणाची दशा आणि दिशा

▸▸ पान ६ वरुन

गरवारे इन्स्टिट्यूट वगळता विद्यापीठात सदर अभ्यासक्रम राबविणारे ते एकमेव महाविद्यालय होते. जवळजवळ ५ ६ वर्षे हा अभ्यासक्रम चालला व तो काही कारणामुळे पुढे बंद पडला. गोव्यात पर्यटन हे आता ओव्हरफ्लो झालेले आहे. त्यामुळे तेथील पर्यटक सिंधुदुर्ग जिल्ह्यात येऊ शकतात. पण येथे एकही पर्यटन एजन्सी नाही. या पार्श्वभूमीवर पर्यटनविषयक अभ्यासक्रम फारच उपयुक्त ठरला असता. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत टुरिझम अँड फूड प्रोसेसिंग हा युवकांसाठी तीन महिन्यांचा अभ्यासक्रमही बांदा महाविद्यालयात सुरू करण्यात आला. तर महिला बचतगटांसाठी पाच दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले. पर्यटन ही एक सामाजिक चळवळ बनविण्याच्या दृष्टीने अशाप्रकारचे प्रशिक्षण उपयुक्त असते पण सध्या तरी पर्यटनविषयक एकही अभ्यासक्रम जिल्ह्यात शिकविला जात नाही. याचे आश्चर्य वाटते. जिल्ह्याचा पर्यटन विकास करण्यासाठी पर्यटन व हॉटिल मॅनेजमेंट, हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटमधील पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविणारे अनुदानित तत्वावर जिल्ह्यात एक सुसज्ज महाविद्यालय सुरू करण्याची गरज आहे. या ठिकाणी इंग्रजीबरोबरच फ्रेंच, रशियन, जर्मन, जपानी या परदेशी भाष संज्ञापनाचा अभ्यास सुरू केल्यास त्यातून टुरिस्ट गाईड निर्माण होतील व त्यामुळे निश्चितच जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला गती मिळू शकेल. त्याचबरोबर येथील सांस्कृतिक व पर्यावरणाचा लाभ घेणारे छोटे-छोटे अभ्यासक्रम राबविता येणेही शक्य आहे. जिल्ह्याची एकूणच विकासाची प्रचंड क्षमता लक्षात घेता सकस, दर्जेदार व कौशल्याधिष्ठित शिक्षणाद्वारेच विकासाची गंगा प्रवाहीत होऊ शकेल. म्हणूनच मुंबई विद्यापीठाच्या कोकणभिमुख धोरणाचा लाभ आता जिल्हावासीयांनी घेण्याची गरज आहे.

आज मुंबई विद्यापीठात ७५१ महाविद्यालये संलग्नित असून विद्यार्थी संख्याही ७ लाखाहून अधिक आहे. एवढा प्रचंड व्याप विद्यापीठाला पेलणे शक्य नसल्याने कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठाची मागणी अधुनमधून होत असते. परंतु ते कितपत योग्य आहे? मुंबई विद्यापीठाच्या पदवीला आंतरराष्ट्रीय मान्यता असल्याने या विद्यापीठाच्या पदवीधरांना नोकऱ्यांत अग्रकम दिला जातो. उद्या कोकण विद्यापीठ झाले तर त्याला ग्रामीण विद्यापीठाचा दर्जा प्राप्त होईल व मुंबई विद्यापीठाच्या पदवी इतकी प्रतिष्ठा मिळणार नाही. कोकणाचे मुंबईशी भावनिक नाते लक्षात घेता मुंबई विद्यापीठाच्या नावेच विद्यापीठाचे विभाजन करून सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी विद्यापीठ स्थापन करणेच योग्य ठरणार आहे.